क्र./जिप/साप्रवि/परिषद/आस्था/ ५०८२ /2024
सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद अमरावती.
दिनांक १६/१०/२०२४

वाचा – १. मा. भारत निवडणुक आयोग पत्र क्रं. ECI/१४८/ २०२४ दि.१५.१०.२०२४
२. मा. संचालक माहीती व जन संपर्क महासंचालनालय यांचे पत्र क्र. वृत्तचित्र -२०२४ /परिपत्रक/का-७/७१५ दिनांक १५.१०.२०२४.
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे दिनांक १५.०३.२०२४ चे निर्देशानुसार

आदेश,

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ जाहीर झाले असुन मा. भारत निवडणुक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोंबर २०२४ पासुन आदर्श आचार संहीता लागु केलेली आहे आदर्श आचार संहीतेच पालन आणि अमलबजावणी होणे यासाठी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी अमरावती यांनी सर्व यंत्रणांना निर्देशीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने अमरावती जिल्हा परिषद च्या मालकीचे शाळा महाविद्यालयांची मैदाने सर्व राजकिय पक्षांचे जाहीर प्रचार सभे करीता मागणी केल्यानुसार मैदानाची परवांनगी देतांना सर्व पक्षीय उमेदवारांना समान संधी देण्यात यावी या तत्वाचा अवलंब करणे करीता सदर प्रक्रीयेचा सन्मंवय जिल्हाधिकारी कार्यालय,पोलीस प्रशासन आणि जिल्हा परिषद यंत्रणेशी ठेवणेसाठी श्री बुध्दभुषण सोनवणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अमरावती. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१. जिल्हा परिषद अंतर्गत वापरण्यात येणारे मैदाने आदर्श आचार संहीता कालवधी मध्ये विविध पक्षाचे प्रतिनिधी कडुन मैदान उपलब्ध करुन देण्या करीता प्राप्त प्रस्ताव हे मुख्याध्यापक यांचेकडे सादर न करता सदर प्रस्ताव हे निवडणुक कालावधीमध्ये मैदानाची पुर्व परवांनगी मा. जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अमरावती.'एक खिडकी' मार्फत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अमरावती यांना कार्यालयीन वेळेत सादर करावे.
२. आदर्श आचार संहीता कालावधी मध्ये सर्व पक्षीय उमेदवारा प्राचार सभा तथा निवडणुकीचे कामकाजा करीता प्रथम येणा-यास प्रथम प्राध्यान्य या तत्वावर मैदान उपलब्ध करुन दयावे. तसेच प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या किमान ४८ तास आगोदर अथवा पुढील ७ सात दिवसामध्ये होणा-या प्रचार सभा व निवडणुक कार्यक्रमा करीता मैदान उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच अर्ज प्राप्त करतांना अर्जाची तारीख व वेळ निश्चिती करणे अनिवार्य राहील.
३. तसेच आदर्श आचार संहीता कालावधी मध्ये विविध पक्ष /संघटना यांचे कडुन प्राप्त अर्ज स्विकारतांना प्रथमत: पोलीस आयुक्त शहर अमरावती यांचे कार्यालयाची पुर्व परवांनगी सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच जिल्हा प्रशासनाकडुन मैदान वापरण्याची परवांनगी देण्यात येईल.
४. मैदानाची पुर्व परवांनगी प्राप्त होताच संबधीत मुख्याध्यापकांनी आयोजकांना तात्काळ मैदान उपलब्ध करुन दयावे व त्याबाबत कोणतीही तक्रार उदभविणार नाही आणि आदर्श आचार संहीतेच पालन होईल याची दक्षता घ्यावी.

Sanjita

**(संजिता महापात्र)भाप्रसे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती.**

माहीतीस्तव

१. मा. जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अमरावती यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त शहर अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस्तव सविनय सादर.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना माहीती करीता तथा पुढील कार्यवाही करीता सादर.
४. मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा ------------------------ अमरावती यांना माहीती करीता रवाना.